महाराष्ट्र शासन

कार्यालय - सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण,जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,प्रशासकिय इमारत,दुसरा माळा,अकोला

ई मेल-sdswo_akl @rediffmail.com (दूरध्वनी फॅक्स ०७२४-२४२६४३८)


जाक्र.सआ/अकोला/भासशि/प्रलंबित अर्ज/१५२/२०१६ अकोला. १७ दिनांक. मे २०१६

महत्वाचे/कालमर्यादा.

प्रति,

प्राचार्य,

..............................................

..............................................

..............................जि-अकोला

विषय :- महाविद्यालयस्तरावर प्रलंबित असलेले भारत सरकार शिष्यवृत्ती आणि शिक्षण फी परिक्षा फी चे प्रलंबित आवेदनपत्राबाबत...

संदर्भ :- १) या कार्यालयाचे पत्र क्रमांक. ११८ दिनांक.१९ जानेवारी २०१६
२) मा:आयुक्त,समाजकल्याण आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य पुणे-१ यांचे पत्र क्रमांक. सकआ/शिक्षण/परिपत्रक/ईस्कॉल/२०१६-१७/१६९८ दिनांक.२६ एप्रिल २०१६
३) या कार्यालयाचे पत्र क्रमांक. १४४७ दिनांक. २ मे २०१६
३) ई-स्कॉलरशिपचे जिल्हा पोर्टलवरील माहितीचे अनुषंगाने

महोदय,

वरील विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यांत येते की, सामाजिक न्याय विभागाने शैक्षणिक सत्र २०११-२०१२ पासून मागासवर्गीय विद्यार्थ्यानां ऑनलाईन शिष्यवृत्ती देण्याची योजना कार्यान्वित करण्यांत आलेली असून त्यानुसार त्यांची अंमलबजावणी जिल्हास्तरावरुन या कार्यालयामार्फत करण्यांत येत आहे. याबाबत सन.२०१५-२०१६ या शैक्षणिक वर्षामध्ये जिल्हास्तरावर / तालूकास्तरावर वेगवेगळया स्वरुपात बैठकीचे आयोजन करुन जिल्हायातील कनिष्ठ ,वरिष्ठ व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयाचे प्राचार्य / भासशि योजनेचे काम करणारे कर्मचा-यांना ऑनलाईन शिष्यवृत्ती बाबत प्रात्यक्षिकासह माहिती देण्यांत आलेली आहे. तसेच सन.२०१४-१५ व २०१५-१६ या शैक्षणिक वर्षातील प्रलंबित आवेदनपत्रे निकाली काढणे करीता या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्रमांक. (१) अन्वये दिनांक. १ फेब्रूवारी २०१६ ते १५ फेब्रूवारी २०१६ या कालावधीत तालूकानिहाय कॅम्पचे आयोजन करण्यांत आलेले होते.

त्याप्रमाणे जिल्हयातील बहूतेक महाविद्यालयांनी त्यांचेकडील प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्याचे भारत सरकार शिष्यवृत्ती बाबतची आवेदनपत्रे ऑनलाईन या कार्यालयाकडे सादर करुन त्यांची देयकेसुध्दा तयार करण्यांत आलेली आहे व अशा मागासवर्गीय विद्यार्थ्याची शिष्यवृत्तीच्या रक्कमा त्यांचे वैयक्तिक बॅक खात्यावर तर महाविद्यलयाच्या शिक्षण फी परिक्षा फी च्या महाविद्यालयाच्या खात्यावर जमा करण्यांत आलेल्या आहे. पंरतु शैक्षणिक सत्र.२०१४-१५ व २०१५-२०१६ संपलेले असूनही उक्त शैक्षणिक सत्रामधील महाविद्यालयात प्रवेशित असलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्याचे भारत सरकार शिष्यवृत्ती / शिक्षण फी परिक्षा फी आवेदनपत्राची छाननी करुन अद्यापही या कार्यालयाकडे सादर केलेली नाहीत.याबाबत आपणांस सन.२०१५-१६ या शैक्षणिक वर्षात संपन्न झालेल्या सभेमध्ये सूचना देवूनही सदर योजनेच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही अद्यापही केलेली नाही. त्यामुळे अशा मागासवर्गीय विद्यार्थ्याचे शिष्यवृत्तीची देयके तयार करता आलेली नाही.

केवळ आपण शिष्यवृत्ती बाबतच्या आवेदनपत्रावर वेळीच कार्यवाही न केल्याने व सदर आवेदनपत्रास ऑनलाईन स्विकृती/पडताळणी/मंजूरी न केल्यामुळे मागासवर्गीय विद्यार्थी शिष्यवृत्ती वेळेत मिळण्यापासून वंचित राहिलेले

महाराष्ट्र शासन
कार्यालय - सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण,जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,प्रशासकिय इमारत,दुसरा माळा,अकोला
ई मेल-sdswo_akl @redi.fmail.com (दूरध्वनी फॅक्स ०७२४-२४२६४३८)


आहे.तव्दतच आयुक्तालयाचे संदर्भिय पत्र क्रमांक.(२) अन्वये सुचित केल्याप्रमाणे सन.२०१६-१७ या शैक्षणिक सत्राकरीता भारत सरकार शिष्यवृत्ती व शिक्षण फी परिक्षा फी प्रदाने योजनेची आवेदनपत्रे निकाली काढणेकरीता समयबध्द कार्यक्रम निश्चित करण्यांत आलेला असून त्याकरीता या कार्यालयाचे पत्र क्रमांक (३) अन्वये कळविण्यांत आलेला आहे. त्यापूर्वी सन.२०१४-२०१५ व २०१५-२०१६ या शैक्षणिक सत्रामधील प्रलंबित राहिलेले भारत सरकार शिष्यवृत्ती / शिक्षण फी परिक्षा फी या योजनेची आवेदनपत्रे दिनांक.३१ मे २०१६ पूर्वी निकाली न काढल्यामुळे असे आवेदनपत्रे ई-स्कॉलरशिपचे ऑनलाईन प्रणाली मधून अदृश्य ( HIDE) करण्यांत येईल.

त्याकरीता आपणांस पुनश्च कळविण्यांत ये े की, सन.२०१४-१५ व २०१५-२०१६ या वर्षातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे आवेदनपत्राची छाननी करुन सदरची आवेदनपत्रे हॉर्डकापी व विवरण पत्र " बी " तसेच आवेदनपत्रे ऑनलाईन प्रणालीव्दारे या कार्यालयाकडे *दिनांक.३१ मे २०१६* पूर्वी सादर न केल्यास सदरचे अर्ज शिष्यवृत्ती / शिक्षण फी परिक्षा फीसाठी पात्र नसल्याचे गृहीत धरुन सिस्टीमवरुन काढून टाकण्यांत येतील. अशा कार्यवाही अभावी मागासवर्गीय विद्यार्थी शिष्यवृत्ती पासून वंचित राहिल्यास त्याबाबतची सर्व जबाबदारी महाविद्यालयाची राहील अशा प्रसंगी कोणत्याही विद्यार्थ्याकडून महाविद्यालय शुल्क आकारणी करु नये. यांची आपणांस जाणिव करुन देण्यांत येत आहे.

सहाय्यक आयुक्त,
समाजकल्याण,अकोला.

प्रतिलीपी माहितीस्तव सविनय सादर.

१) मा.आयुक्त,समाजकल्याण, आयुक्तालय महाराष्ट्र राज्य,पुणे-१
२) मा.संचालक,विजाभज,विमाप्र व इमाव कल्याण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे-१
३) मा.कुलसचिव,संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती
४) मा.कुलसचिव,डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ,अकोला
५) मा.सहसंचालक,उच्च शिक्षण,अमरावती विभाग अमरावती
६) मा.सहसंचालक,तंत्र शिक्षण,अमरावती विभाग अमरावती.
७) मा.उपसंचालक,शिक्षण,अमरावती विभाग अमरावती
८) मा.प्रादेशिक उपायुक्त,समाजकल्याण,अमरावती विभाग अमरावती.
९) शिक्षणाधिकारी (माध्यमिक ) जिल्हा परिषद,अकोला

सहाय्यक आयुक्त,
समाजकल्याण,अकोला.

---

पृष्ठांकन क्र:-विकाअ/शिक्षण/ना-हरकत/२०१६/2064
सहसंचालक, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती.
दिनांक 2 3 MAY 2016

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

प्रत :-

१) प्राचार्य, पदवी व पदविका संस्था (अकोला जिल्हा) यांना कळविण्यात येते की, वरील पत्राच्या अनुषंगाने कार्यवाही करावी.

२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.